Marathwada Shikshan Prasarak Mandal’s

# Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon




## INTERNAL QUALITY ASSURANCE CELL

## Criterion VII- Institutional Values & Best Practices

### 7.1 Institutional Values and Social Responsibilities

**7.1.4 Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and Sensitization of students and employees to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens.**

## Report of Celebration of ‘Marathi Bhasha Din’

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव

## मराठी विभाग

### मराठी भाषा दिन अहवाल

**मराठी भाषा दिन:** दि.27 फेब्रुवारी 2018 रोजी मराठी विभागाच्या वतीने जागतिक मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. यावेळी कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. काकासाहेब गंगणे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा. सुरेश देशमुख प्रा. भाऊसाहेब राठोड होते. यावेळी कवी कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन करून त्यांच्या कार्यकर्तृत्वावर मान्यवरांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. भाऊसाहेब नळे यांनी केले.




**मराठी भाषा दिन :** दिनांक 27 फेब्रुवारी 2019 रोजी मराठी विभागाच्या वतीने जागतिक मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. यावेळी कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये मराठी विभागप्रमुख डॉ. भाऊसाहेब

राठोड होते. यावेळी कवी कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन करून त्यांच्या कार्यकर्तृत्वावर मान्यवरांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. भाऊसाहेब नळे यांनी केले.



**मराठी भाषा दिन :** दिनांक 27 फेब्रुवारी 2020 रोजी मराठी विभागाच्या वतीने जागतिक मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. यावेळी कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. काकासाहेब गंगणे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा. सुरेश देशमुख, डॉ. भाऊसाहेब राठोड होते. यावेळी मराठी भाषेविषयी विचार मंथन करत विद्यार्थ्यांनी भाषेविषयी आपली मते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. एम. ए. कव्हळे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. भाऊसाहेब नळे यांनी केले.







**मराठी भाषा दिन :** दिनांक 27 फेब्रुवारी 2021 रोजी मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयामध्ये मराठी भाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या

शुभहस्ते झाले. या कार्यक्रमामध्ये रसायनशास्त्र विभागाचे डॉ. सतीश डाके यांनी मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. बी. डी. राठोड, हिंदी विभागाचे विभागप्रमुख डॉ. के. बी. गंगणे, डॉ. एम. ए. कव्हळे यांची विचारमंचावर उपस्थिती होती. मराठी भाषा ही महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून ती जगाची भाषा आहे. भारताचे अनेक प्रांत मराठी भाषिकांनी व्यापलेले असून जगाच्या पातळीवर मॉरिशससारखा देश मराठी भाषिकांचा देश म्हणून ओळखला जातो. मराठी भाषा ही फक्त भाषा न राहता ती ज्ञानाची भाषा व्हावी, यासाठी सर्वांनी प्रयत्न केले तर मराठीचा झेंडा अटकेपार न राहता तो जगाच्या कानाकोपऱ्यात फडकेल असे मत यावेळी डॉ. सतीश डाके यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, मराठी विभागप्रमुख डॉ. बी. डी. राठोड, हिंदी विभागप्रमुख डॉ. के .बी. गंगणे यांनी मराठी भाषा दिनानिमित्त यथोचित मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्याम वाघमारे यांनी केले तर आभार प्रा. निमसे यांनी मानले.





**मराठी भाषा दिन** : दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. काकासाहेब गंगणे यांनी भूषविले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रा. प्रकाश गवते यांनी मराठी भाषा जतन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येक मराठी माणसावर असल्याची भावना व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात प्रा. गंगणे यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्यावर प्रकाश टाकला. प्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले तर आभार प्रा. अरुण पेंटावार यांनी मानले.







**Coordinator**
Internal Quality Assurance Cell (IQAC)
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon, Dist.Beed (MS)

Sunderrao Solanke Mahavidyalaya Majalgaon
MAJALGAON DIST.BEED (MAHARASHTRA)

( डॉ. भाऊसाहेब राठोड )
मराठी विभागप्रमुख

PRINCIPAL
Sunderrao Solanke Mahavidyalya
Majalgaon Dist. Beed (M.S.)